# नियमित दिवाणी मुकदमा नं. ४०/२०२० मधील निशाणी १०१ वरील आदेश

( मनोहर केशव पाटील तर्फे संतोष मनोहर पाटील वि. चंद्रकांत महादेव पाटील वगैरे)

१. वादी याने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ प्रमाणे दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये दुरुस्तीसाठी केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द ठरावाकरीता, हक्क प्रस्थापनेकरीता, सरसनिरस वाटपाकरीता तसेच प्रतिवादी क्र. २ हे दावा मिळकतीतील सर्व्हे नं.१८८, हिस्सा नं.१/फ मधील ४ गुंठे जागेत बेकायदेशीरपणे करीत असलेल्या घराचे बांधकाम थांबविण्याकरीता तुर्तातुर्त मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे. वादीतर्फे दावा दाखल झाल्यावर वादीस मिळकतींचे वर्णन करताना अनावधानाने परिशिष्ठ १–अ मधील काही मिळकती या कै.केशव महादेव पाटील यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असल्याने त्या परिशिष्ठ १–ब मध्ये अनावधानाने लिहील्याचे कळाले. सदर प्रमाणे दुरुस्ती करण्याकरीता सदरचा अर्ज केला आहे. तसेच न्यायालयाचा जैसे–थे चा हुकूम केल्यानंतर सुध्दा प्रतिवादीने दावा मिळकतीत घराचे बांधकाम चालू ठेवले असुन आर.सी.सी.फ्रेम तळमजला अधिक दोन मजले बांधकाम केलेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीचे स्वरुप बदलले आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम पाडून तोडून दावा मिळकतीची परिस्थिती दावा दाखल करण्यापूर्वी जशी होती तशी मागण्याकरीता अनिवार्य ताकीदीचे आदेश मिळण्याकरीता दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दाखल केल्यानंतर सन २००३ मध्ये एकूण सात मिळकती दिनांक २६/०८/२००३ रोजी नोंदणीकृत वाटणीपत्राने वादी व प्रतिवादी क्र. २, ३ व ४ यांनी मिळकतीचे अधिकार अभिलेखासदरी वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली व त्या त्या हिश्याप्रमाणे मिळकती नावे झाल्या असे समजून आले आहे.

त्याप्रमाणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सदरची चुक ही अनावधानाने तसेच परिस्थितीमध्ये झालेल्या बदलामुळे झालेली असून ती दावा दाखल झाल्यानंतर लक्षात आलेली आहे. वादी यांनी ती जाणूनबुजून केलेली नाही.

३. वादीचे असे कथन आहे की, सदरच्या नियोजित दावा दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदरची दुरुस्ती न्यायदानासाठी आवश्यक आहे. याउलट सदरचा अर्ज नामंजूर झालेस वादींचे नुकसान होणार आहे. सबब, वादीने दाव्यामध्ये व तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये सदरची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी नं.१ ते ३, ४/१, ४/२, ८ ते १० यांनी सदरचा अर्जास निशाणी १०३ कडे म्हणणे दाखल करुन सदर अर्ज त्यांना मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादी करु पहात असलेली दुरुस्ती ही बेकायदेशीर असून त्यामुळे प्रतिवादींचे पुराव्यावर परिणाम होणार आहे. वादीस दावा दाखल करताना सर्व माहिती होती, परंतु चुकीच्या पध्दतीने खोटी कथने केलेली आहेत. वाटप झाल्यावर १७ वर्षांनंतर वादी वाटप अमान्य असल्याबाबत दुरुस्ती मागत आहे. तसा नैतिक अधिकार वादीस नाही. केलेल्या मागण्या खोटया आहेत. दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे प्रतिवादींवर अन्याय होणार आहे. वादीचा सदरचा अर्ज खोटा व बनावट असून तो नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. ५, ६, ११ व १२ यांनी निशाणी १०८ वर म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी सदर दुरुस्तीस हरकत नसल्याचे नमूद केले आहे. प्रतिवादी क्र. ७ हे

अभिलेखावर पक्षकार नाहीत.

६. वादीचा अर्ज, त्यावरील प्रतिवादी नं.१ ते ३, ४/१, ४/२, ८ ते १० यांचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

७. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबत</u>–**

८. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता वादींनी मागितलेली दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जांमध्ये मागितलेल्या दुरुस्ती या तीन स्वरुपाच्या आहेत. वादीने मागितलेली पहिली दुरुस्ती ही दाव्यातील दावा कलम १–अ मधील क्रमांक २, ३, ४ व ९ या मिळकती काढून टाकून त्या मिळकती दावा कलम १–ब मध्ये क्रमांक ३ नंतर टाकण्यात याव्यात या विषयी आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा कलम १–अ मधील मिळकती या कै. महादेव धर्मा पाटील यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत व दावा कलम १–ब मधील मिळकती या कै.केशव महादेव पाटील यांच्या स्वकष्टार्जित मिळकती

होत्या. दावा कलम १–अ मधील क्रमांक २, ३, ४ व ९ या मिळकती अनावधानाने दावा कलम १–अ मध्ये नमूद झालेल्या आहेत. परंतु सदरील मिळकती या दावा कलम १–ब मध्ये नमूद करणे आवश्यक आहे. वादीच्या वकीलांनी युक्तिवाद केला की, सदर कामी अदयाप मुददे निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे वादीला दावा दुरुस्ती मागता येईल. प्रतिवादीचे वकील ॲड. जाधव यांनी वादीने मागितलेली दावा दुरुस्ती ही प्रतिवादीचे कैफियतीनंतर आलेली आहे. त्यामुळे प्रतिवादीचे हक्कावर गदा येणार आहे. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणेत येवू नये.

९. वादीने मागितलेली सदर प्रथम दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, सदर मिळकती अनावधानाने दावा कलम १–अ मध्ये नमूद झालेल्या आहेत. परंतु, सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीच्या अनावधानाबाबत वादीवर दंड आकारुन सदर दुरुस्ती मंजूर करता येणे शक्य आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

१०. वादीने याकामी दिनांक २६/०८/२००३ रोजीच्या वादी व काही प्रतिवादी यांचे दरम्यान झालेल्या नोंदणीकृत वाटणीपत्राचे दृष्टीने दाव्यामध्ये दावा कलम ६–अ व १४–अ(१) अधिकपणे समाविष्ट करण्यासाठी दुसरी दावा दुरुस्ती मागितली आहे. वादीचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, सदर वाटणीपत्राबाबत वादीस सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल केल्यानंतर समजून आले आहे. सदर वाटणीपत्रात दावा

मिळकती समाविष्ट असल्याने त्याबाबत न्याय मागण्याचा अधिकार वादीस आहे. तसेच सदरची बाब ही याच दावा मिळकतींसंदर्भात असल्याने त्याबाबत योग्य तो न्यायनिर्णय याच कामी झाल्यास उभय पक्षकारांना नविन अधिक दावे करावे लागणार नाहीत. प्रतिवादीचे वकील श्री.जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, वादीला दावा करण्यापूर्वी सर्व वस्तुस्थिती व दिनांक २६/०८/२००३ च्या नोंदणीकृत वाटणीपत्राविषयी ज्ञान होते. परंतु, वादीने मुददामपणे सदर वाटपपत्र ब–याच विलंबाने अमान्य करुन खोटी व चुकीची बेकायदेशीर मागणी याकामी केलेली आहे. सबब, ती नामंजूर करावी.

११. वादीने मागितलेली सदर दुसरी दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, सदर दिनाक २६/०८/२००३ रोजीचे नोंदणीकृत वाटणीपत्राविषयी त्यास सदर प्रतिवादींनी कैफियत दाखल केल्यानंतर ज्ञान झालेले आहे. सदरचे नोंदणीकृत वाटणीपत्र हे याच दावा मिळकतीविषयी आहे. सबब, त्याबाबतचा न्यायनिर्णय याकामी होणे योग्य होईल. सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीच्या अनावधानाबाबत वादीवर दंड आकारुन सदर दुरुस्ती मंजूर करता येणे शक्य आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल.

१२. वादीने याकामी तिसरी दावा दुरुस्ती ही प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीपैकी सर्व्हे नं. १८८/१/ब या मिळकतीबाबत या दाव्याकामी न्यायालयाने

दिलेल्या 'जैसे–थे' आदेशाचा भंग करुन प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदर मिळकतीवर केलेल्या बांधकामाबाबत दाव्यामध्ये दावा कलम ६–ब व १४–ड(१) अधिकपणे समाविष्ट करण्यासाठी तिसरी दावा दुरुस्ती मागितली आहे. वादीचे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, सदरची दावा दुरुस्ती ही दावा दाखल झाल्यानंतर परिस्थितीमध्ये झालेल्या बदलाबाबत आहे. सबब, सदर बेकायदेशीर बांधकाम पाडून मागण्यासाठी सदरची दावा दुरुस्ती गरजेची आहे. प्रतिवादीचे वकील श्री.जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, यामुळे दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. तसेच याकामी वादीने अधिक कोर्ट फी भरलेली नाही. वादी सदर कामी वेळकाढूपणा करत आहे. सदर प्रतिवादींनी समन्स मिळाल्यानंतर कोणतेही बांधकाम केलेले नाही व 'जैसे–थे' आदेशाचा आदर केलेला आहे. त्यामुळे तशी दुरुस्ती करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

१३. वादीने मागितलेली सदर तिसरी दावा दुरुस्ती ही दावा दाखल झाल्यानंतर उदभवलेल्या परिस्थितीनुसार केलेली आहे. वादी कथन करतो त्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आदेशाचा भंग करुन जादा बांधकाम केले व ते विनापरवाना, अनधिकृत आहे किंवा कसे हे पुराव्याअंती ठरणार आहे. मागितलेली दावा दुरुस्ती ही दाव्यातील मुददे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर कामी अदयाप मुददे निश्चित होवून पुरावा सुरु झालेला नाही. वादीचे असे कथन आहे की, सदर मागितलेली दावा दुरुस्ती ही दावा दाखल झाल्यानंतरच्या परिस्थितीबाबत आहे. सबब, त्याबाबतचा न्यायनिर्णय याकामी होणे योग्य होईल. सदर कामी दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीस पुन्हा जादा कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. सदर दावा दुरुस्ती करु न दिल्यास उभय पक्षकारांचे वादातीत मुददे निश्चित करुन त्यावर योग्य न्यायनिर्णय होणार नाही. सबब, सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल.

१४. वादीतर्फे *वर्सा स्पोर्टस क्लब आणि इतर वि. एरेस डिसोझा उर्फ आयरस जेनीसिओ जोस इस्टेवम दा कोस्टा आणि इतर, २०२१(४) ऑल एमआर ४७१* या मा. पणजी उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायतत्वांमध्ये दावा दुरुस्ती केवळ मिळकतीचा क्रमांक, चतुःसिमा दाव्याचे स्वरुप न बदलता व कोणतीही नविन बाब समोर न आणता मागितली असल्यास सदर दावा दुरुस्ती न्यायास अनुसरुन मंजूर करता येवू शकते. सदरची न्यायतत्वे वादीस उपयोगी पडतात. कारण सदर दावा दुरुस्तीद्वारे वादी दावा दाखल झाल्यानंतरची परिस्थिती तसेच त्याला दावा दाखल झाल्यानंतर माहिती झालेल्या बाबींविषयी दुरुस्ती मागितली आहे.

१५. वादीने *गणेश ट्रेडींग कंपनी वि. मोजी राम, निकाल तारीख २५/०१/१९७८* या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायतत्वांमध्ये दावा दुरुस्तीने केवळ वादी कोणत्या पात्रतेने दावा दाखल करत आहे अशी महत्वाची बाब प्रतिवादीच्या न्यायहक्कांवर गदा न आणता मागत असेल तर अशी दावा दुरुस्ती मंजूर करता येते असे नमूद केले आहे. सदरची न्यायतत्वे वादीस उपयोगी पडतात. कारण सदर दावा दुरुस्तीद्वारे वादी दावा दाखल झाल्यानंतरची परिस्थिती तसेच त्याला दावा दाखल झाल्यानंतर माहिती झालेल्या बाबींविषयी दुरुस्ती मागितली आहे.

*१६. वादीने* *हरी शंकर सिंघानिया आणि इतर वि. डॉ.गौर हरी सिंघानिया आणि इतर, २००३(१) ऑल एमआर ५४८* या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायतत्वांनुसार दावा दुरुस्ती मंजूर करणे हा

नियम आहे व नामंजूर करणे हा अपवाद आहे. तसेच सदर दावा दुरुस्ती मंजूर करताना दावा दुरुस्तीने दावा मुदतीत आहे किंवा कसे हे विचारात घेवू नये असे नमूद केले आहे. सदरची न्यायतत्वे वादीस उपयोगी पडतात. कारण सदर दावा दुरुस्तीद्वारे वादी दावा दाखल झाल्यानंतरची परिस्थिती तसेच त्याला दावा दाखल झाल्यानंतर माहिती झालेल्या बाबींविषयी दुरुस्ती मागितली आहे.

१७. वादीने *लोक हाउसिंग ॲन्ड कन्स्ट्रक्शन्स वि. एव्हरेस्ट इंडस्ट्रीज लिमी. आणि इतर, २००३(२) बॉम्बे सीआर ५१० व रोसारीनो एम. फर्नांडीस वि. संतोष जुवेकर उर्फ संतोष, निकाल तारीख १९/०३/२००८* या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे. सदर न्यायतत्वांनुसार दावा दाखल झाल्यानंतरच्या दावा मिळकतीसंदर्भातील झालेल्या व्यवहारांबाबत दावा दुरुस्ती मागता येईल असे नमूद केले आहे. सदरची न्यायतत्वे वादीस उपयोगी पडतात. कारण सदर दावा दुरुस्तीद्वारे वादी दावा दाखल झाल्यानंतरची परिस्थिती तसेच त्याला दावा दाखल झाल्यानंतर माहिती झालेल्या बाबींविषयी दुरुस्ती मागितली आहे.

१८. वादीने सदर कामी त्याच्या तुर्तातुर्त मनाईच्या अर्जामध्ये देखील दुरुस्ती मागितली आहे. प्रतिवादीचे वकील श्री. जाधव यांनी सदर दुरुस्तीस आक्षेप घेतला आहे. श्री. जाधव यांनी युक्तिवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे केवळ वादपत्र किंवा जबाब (pleading) मध्येच दुरुस्ती करता येते. वादीने दिलेला तुर्तातुर्त मनाईचा अर्ज हा वादपत्र किंवा जबाब (pleading) या सदरात मोडत नाही. वादीचे वकीलांनी वादीने दावा दुरुस्ती मागितल्यास त्याला मनाईच्या अर्जामध्ये देखील दुरुस्ती मागता येवू शकते असा युक्तिवाद केला आहे. वादीच्या वकीलांनी

*बाकुनवर्बा जाखुभा जडेजा आणि इतर वि. चंदुभा गुमानसिंग झाला आणि इतर, एआयआर १९९७ गुज. १७०* या मा. गुजरात उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. सदर न्यायतत्वांनुसार दावा दाखल झाल्यानंतर वादीस दावा मिळकतीच्या वर्णनाबाबत दावा मिळकतीच्या वर्णनाची दुरुस्ती मागता येईल असे नमूद केले आहे. तसेच सदर न्यायतत्वांनुसार वादीस केवळ दावा मिळकतीच्या वर्णनात दुरुस्ती मागावयाची असल्याने सदरची दुरुस्ती मनाईचे अर्जामध्ये देखील करता येईल असे नमूद केले आहे.

१९. वादीने मनाई अर्जामध्ये मागितलेल्या दुरुस्त्यांचे स्वरुप पाहता वादीने मनाई अर्जामध्ये बरीच दुरुस्ती मागणी केलेली आहे. त्यामुळे वादीस सदर तुर्तातुर्त मनाईचे अर्जामध्ये दुरुस्ती मागता येणार नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे केवळ वादपत्र किंवा जबाब (pleading) मध्येच दुरुस्ती करता येते. वादीने दिलेला तुर्तातुर्त मनाईचा अर्ज हा वादपत्र किंवा जबाब (pleading) या सदरात मोडत नाही. तसेच दावा दुरुस्ती झाल्यावर वादीस नविन तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल करता येवू शकतो. त्यामुळे त्याचे काहीही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीने तुर्तातुर्त मनाई अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती मंजूर करता येणार नाही. मा. उच्च न्यायालयाच्या बाकुनवर्बा जाखुभा जडेजा (वर नमुद) न्यायनिर्णयाचा आदर राखून मी असे नमूद करतो की, सदरची न्यायतत्वे वादीस उपयोगी पडत नाहीत. कारण सदर अर्ज दुरुस्तीद्वारे वादी मुळ अर्जापेक्षा अधिक अशी अर्ज दुरुस्ती मागत आहे. सदर कामी वादीने दावा मिळकतीच्या वर्णनाव्यतिरीक्त इतर अनेक ठिकाणी अर्ज दुरुस्त्या मागितल्या आहेत. त्यामुळे वादीला केवळ दाव्यात दुरुस्ती करता येईल.

२०. सदरचा दावा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची दावा दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी अंशतः होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज रु.१,०००/– दंडावर अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदर दंडाची रक्कम वादीने प्रतिवादी क्र. १ ते ३, ४/१, ४/२, ८ ते १० यांना पुढील तारखेचे आत द्यावी. |
| ३. | वादीची तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जामधील दुरुस्तीची मागणी नामंजूर करणेत येत आहे. |
| ४. | वादीने दाव्यामध्ये विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ५. | वादीने दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण –उरण
दिनांक – ०७.०९.२०२१.

(निलेश एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.